मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

**'नॅक' पुनर्मुल्यांकित - 'अ' श्रेणी**

***Re-ACCREDITED WITH 'A' GRADE BY NAAC***

दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजी झालेल्या
अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

●

Minutes of the Ordinary Meeting of the Senate
held on 17th October, 2014.

मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

<u>'नॅक' पुनर्मुल्यांकित - 'अ' श्रेणी</u>

***<u>Re-ACCREDITED WITH 'A' GRADE BY NAAC</u>***

**दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजी झालेल्या**
**अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

●

Minutes of the Ordinary Meeting of the Senate
held on 17th October, 2014.

मुंबई विद्यापीठ

<u>मसुदा</u>

<u>अधिसभा</u>

क्रमांक :- १.२०१४-१५

१७ ऑक्टोबर २०१४

**अधिसभेची** सर्वसाधारण सभा विद्यापीठाचे सर कावसजी जहांगीर सभागृह **(दीक्षांत सभागृह)**, येथे शुक्रवार दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजी मा. कुलगुरूंच्या **अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सभेमध्ये पुढील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू)
प्राचार्य (डॉ.) नरेश चंद्र (प्र-कुलगुरू)
**प्राचार्य (डॉ.)** राजपाल हांडे
डॉ. मृदुळ जगन्नाथ निळे
**श्री.** भुजंग किसनराव अहिरे
डॉ. दिलीप शंकरराव पाटील
**प्राचार्य** रविंद्रन कर्थाडी
प्राचार्या (श्रीमती) मंजुळा जेठानंद निचाणी
**प्राचार्य (डॉ.)** गोरक्ष विठ्ठल पारगांवकर
प्राचार्य नारायण मधुकर राजाध्यक्ष
**प्राचार्य** मारोती तुळशिराम भगत
प्राचार्य (डॉ.) विष्णू नंदा मगरे
**प्राचार्य (डॉ.)** मुरलीधर एस. कु-हाडे
प्राचार्य दिलीप गंभीर बोरसे
**प्राचार्या (श्रीमती)** ॲन्सी जोस
प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव यशवंतराव पाटील
**प्राचार्या (श्रीमती)** चैताली तापस चक्रवर्ती
प्राचार्य (डॉ.) कृष्णा अप्पया पाटील
**प्राचार्य** विठ्ठल बळीराम रोकडे
प्राचार्य सुधीर रामचंद्र भोसले
**प्राचार्या (श्रीमती)** हर्षा कमलेश मेहता
प्राचार्या (श्रीमती) प्रमिला श्रीकांत राऊत
**प्राचार्य (डॉ.)** सिद्धेश्वर तुकाराम गडदे
श्री. झहीर इशाक काझी
श्री. हसमुख देवजी रांभीया
श्री. महेश काशिनाथ म्हात्रे
श्री. संजय बाबुराव शेटे
श्रीमती कवल अजय वर्मा
डॉ. एम.ए.खान (सचिव)
डॉ.(श्रीमती) मोहसिना मुकादम
डॉ. शितलाप्रसाद दुबे
डॉ. (श्रीमती) शशिरेखा सुरेश कुमार
डॉ. (श्रीमती) संगिता अतुल गोडबोले
डॉ. संजय कुमार
डॉ. (श्रीमती) अनुराधा संदिप मझुमदार
डॉ. विवेक बळवंतराव देशमुख
डॉ. अभय नामदेवराव बांबोले
डॉ. (श्रीमती) सुनिता दशरथ खारीवाल

| | |
|---|---|
| डॉ. प्रल्हाद गंगाराम पवार | डॉ. दिपक गंगाधरराव बोडखे |
| डॉ. (श्रीमती) माधवी सुधीर निकम | डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद |
| डॉ. (श्रीमती) अनुपमा जयवंत सावंत | डॉ. वसंत सिताराम शेकडे |
| डॉ. विजय नामदेव पवार | डॉ. (श्रीमती) सुप्रिया दि. करंडे |
| श्री. महादेव बाबुराव जगताप | श्री. प्रदीप बाळकृष्ण सांवत |
| श्री. सुधाकर शंकर तांबोळी | श्री. गणेश सदाशिव चव्हाण |
| श्रीमती निलीमा नंदकुमार भुर्के | श्री. संजय तुळशीराम वैराळ |
| श्री. शशिकांत काशिनाथ झोरे | श्री. राजन वसंत कोळंबेकर |
| प्राचार्य मुरलीधर गोविंदराव चांदेकर | प्रा. अंबादास येलोजी मोहिते |
| श्री. प्रकाश विठ्ठल पागे | प्रा. (श्रीमती) रूपा भोगीलाल शाह |
| डॉ. राजन मोरेश्वर तुंगारे | डॉ. उदय साळुंखे |
| डॉ. (श्रीमती) शुभदा अविनाश जोशी | डॉ. (श्रीमती) कविता रामचंद्र लघाटे |
| डॉ. प्रल्हाद गंगाराम जोगदंड | प्राचार्या डॉ.(श्रीमती) माधुरी किरण पेजावर |
| डॉ. सुरेश किसनराव उकरंडे | प्राचार्य (डॉ.) टी. पी. मधू नायर |
| श्री. दिलीप दगडू पवार | डॉ. बाळकृष्ण विठ्ठल भोसले |
| डॉ. गंगाधर आसाराम मेश्राम | डॉ. (श्रीमती) सुनिता विठ्ठलराव मगरे |
| डॉ. (श्रीमती) शेफाली रसेंद्रा पंडया | डॉ. रामभाऊ महादू बडोदे |

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

अधिसभेच्या कामकाजाला सुरूवात करताना मा. कुलगुरूंनी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने सभेत उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५ (२) (पी) नुसार डॉ. (श्रीमती) शशीरेखा सुरेश कुमार तसेच कलम २५ (२) (आर) नुसार सुप्रिया करंडे यांची अधिसभेवर नेमणूक झाल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनातर्फे व अधिसभेतर्फे त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

यानंतर श्री. भिकू इदाते, डॉ. बी.पी.मिश्रा, डॉ. ए.पी.पांडे आणि ॲड. सलीम पटेल या सन्माननीय सदस्यांची अधिसभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य करण्यात आली.

त्यानंतर सभागृहाने समाजाच्या विविध क्षेत्रात बहुमूल्य योगदान दिलेल्या श्री. आनंद बाळाजी देशपांडे, श्री. सुधीर मोघे, श्री. खुशवंत सिंग, श्री. कुलदीप पवार, श्रीमती बेबी नंदा, श्री. जयवंत चुनेकर, श्री. दत्ताजी ताम्हणे, श्री. व्ही.के.मुर्ती, श्री. गजानन भागवत, श्रीमती सुधाताई वर्दे, कॉ. शरद पाटील, डॉ. रा.रा.आंबर्डेकर, डॉ. विद्या आचार्य, श्रीमती गोदावरी भालचंद्र चुरी, डॉ. मेहरू बंगाली, श्री. माधव मंत्री, श्री. आनंद मोडक, श्रीमती झोहरा सहगल, डॉ. अशोक केळकर, श्री. एम.व्ही. कामत, श्री. दाभोळकर, श्रीमती टिकेकर, प्रो. बिपीन चंद्र, शबीर शेख, श्री. हसमुख उपाध्ये यांच्या तसेच मुंबई विद्यापीठातील ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे दु:खद निधन झाले त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून दोन मिनिटे मौन धारण करून श्रध्दांजली वाहिली.

**महत्वपूर्ण घडामोडी:-**

➢ राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या देशातील अनेक मान्यवरांना पद्म पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रख्यात वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर यांना पद्मविभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच प्रसिध्द अभिनेते कमल हसन, बेगम परवीन सुलताना आणि बॅडमिंटनपटू पी. गोपीचंद यांच्यासह १२ जणांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. अभिनेत्री विद्या बालन, नयना आपटे-जोशी, डॉ. रमाकांत देशपांडे, डॉ. शशांक जोशी, प्रतापराव पवार, भारतीय महिला कबडी पथकाचे प्रशिक्षक सुनील डबास, वालुकाशिल्पी सुदर्शन पटनायक, कार्यकर्ते जवाहरलाल कौर व अन्य ५३ जणांना राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले.

➢ पीपल्स शिक्षण संस्थेच्या डॉ. आंबेडकर महाविद्यालयाला २०१२-१३ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे सहायक प्राध्यापक श्री. गणेश चंदनशिवे यांना 'उस्ताद बिस्मील्ला खाँ युवा पुरस्कार' जाहीर झाला आहे.

➢ मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रकपदी श्री. दिनेश भोंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

➢ दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठाच्या १५८ व्या वर्धापन दिन समारंभाचे औचित्य साधून विद्यापीठातील गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा तसेच विद्यापीठ

सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. तसेच लोकसेवा आयोगाच्या २०१३ परीक्षांमध्ये यश मिळविणा-या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार यावेळी करण्यात आला त्यांचे मनपूर्वक अभिनंदन.

➢ "सवित्रीबाई फुले आदर्श शिक्षा पुरस्कार २०१३-२०१४" विलेपार्लेच्या मिठीबाई महाविद्यालयाच्या डॉ अंजली पाटकर यांना मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू, डॉ. राजन वेळूकर यांच्या हस्ते देण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठाच्या ४७ व्या युवा महोत्सवामध्ये मराठी एकांकिका विभागाची अंतिम फेरी शाहिर अमरशेख सभागृहात पार पडली. यामध्ये मिठीबाई कॉलेजच्या ए.डी. -बी.सी. या एकांकिकेने यामध्ये बाजी मारत पहिला क्रमांक पटकावला.

➢ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अहिंसा अणि विश्वबंधुत्वाचा संदेश देण्यासाठी तसेच मुल्याधिष्ठित जीवनप्रणालीचे महत्त्व पटवून देण्यासाठी मुंबई विद्यापीठातर्फे मुनीजन स्पर्धेचे आयोजन केले जाते. यंदा या मुनीजन स्पर्धेचे विजेतेपद माटुंगा येथील वेलिंगकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेने पटकावले.

➢ मुंबई विद्यापीठ आंतरमहाविद्यालय फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात रिझवी महाविद्यालयाने जेतेपद पटकावले.

➢ रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार सुपर - रिझॉल्व्ह फ्लुरोसन्स सूक्ष्मदर्शिका विकसित करणारे एरिक बेटझिग, स्टीफन डव्लू. हेल आणि विल्यम मॉर्नर या तीन शास्त्रज्ञांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

➢ भारतातील बालहक्क चळवळीचे अग्रणी, बालमजुरी विरोधात लढा देणारे कैलाश सत्यार्थी आणि स्त्री शिक्षणासाठी तालिबानी बंडखोरांच्या विरोधात समर्थपणे उभी राहणारी पाकमधील सतरा वर्षांची मलाला युसुफझाई या दोघांना शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

➢ ९५ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अभिनेत्री फैय्याज यांची निवड करण्यात आली आहे.

➢ दिनांक २० मार्च, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठात 'आईज' या उपक्रमाअंतर्गत शैक्षणिक नियोजन व प्रशासन राष्ट्रीय विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. आर. गोविंद यांच्या व्याख्यानाचे आयोजन विद्यानगरी परिसरातील मार्शल हॉल, जवाहरलाल नेहरू ग्रंथालय येथे करण्यात आले होते.

➢ दिनांक २४ ते २७ मार्च, २०१४ रोजी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कार्य करणा-या मुंबई विद्यापीठाच्या 'ॲकॅडमी ऑफ थिएटर आर्ट्स' विभागाच्या दशकपुर्ती निमित्ताने राष्ट्रीय नाट्य विद्यालय, नवी दिल्ली आणि राज्य शासनाच्या सहकार्याने राष्ट्रीय महारंग परिषदेचे आयोजन विद्यानगरी परिसरात करण्यात आले होते. या समारंभासाठी भारतभरातून ख्यातनाम रंगकर्मी उपस्थित होते. या कार्यक्रमांच्या उद्घाटनाप्रंसगी मा. कुलगुरू, डॉ. राजन वेळूकर यांनी मुंबई विद्यापीठात 'मोबाईल थिएटर ॲकॅडमी' सुरू करणार असल्याचे जाहीर केले.

➢ दिनांक २९ मार्च, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठात 'आईज' या उपक्रमाअंतर्गत ज्येष्ठ कन्नड साहित्यिक व साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा. एस. एल. भयरप्पा यांचे 'तत्वज्ञान ते साहित्य-माझा प्रवास' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन विद्यानगरी परिसरातील फिरोजशहा मेहता भवन येथे करण्यात आले होते.

➢ मुंबई विद्यापीठात शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी दोन नवीन वसतीगृह बांधण्यासाठी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाकडून ३.७२ कोटींचे अनुदान मिळाले आहे. विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात मागासवर्गीय मुलांसाठी १०० विद्यार्थी संख्येचे तसेच मुलींसाठी ९६ विद्यार्थी संख्येचे अशी एकूण १९६ विद्यार्थी संख्येची दोन वसतिगृहे तयार होणार आहेत.

➢ दिनांक ९ एप्रिल, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठातर्फे महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहानिमित्त फुले व आंबेडकर यांच्या दुर्मिळ पुस्तकांचे प्रदर्शन विद्यानगरी परिसरातील पं. जवाहरलाल नेहरू ग्रंथालय येथे ठेवण्यात आले होते.

➢ दिनांक १२ मे, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठातर्फे व नॅशनल इनोव्हेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठात समर स्कुल या अभिनव उपक्रमाचे विद्यानगरी येथील व्हर्च्युअल क्लासरूम येथे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. एम. एम. शर्मा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

➢ दिनांक १२ जुलै, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठाच्या हिंदी विभागातर्फे प्रसिध्द समीक्षक डॉ. रामजी तिवारी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम विद्यानगरी येथील मराठी भाषा भवनात आयोजित केला होता.

➢ दिनांक १७ जुलै, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठ व हवाई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कळवा, ठाणे येथे कम्युनिटी महाविद्यालय संकुल आणि एक्सलन्स सेंटर लवकरच उभारले जाणार आहे व यासाठी कळवा येथे काही वर्षांपासून राखीव ठेवण्यात आलेली सात एकर जागा या महाविद्यालयासाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, मा. श्री. राजेश टोपे व वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री. जितेंद्र आव्हाड यांनी मुंबई विद्यापीठात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

➢ दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठाचा १५८ व्या वर्धापन दिन समारंभ विद्यानगरी परिसरातील सर फिरोजशहा मेहता भवन येथे आयोजित करण्यात आला होता. या समारंभाचे औचित्य साधून विद्यापीठातील गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा तसेच विद्यापीठ सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. तसेच लोकसेवा आयोगाच्या २०१३ परीक्षांमध्ये चांगली कामगिरी करणा-या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार यावेळी करण्यात आला.

➢ दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठाचा १५८ वा वर्धापन दिन समारंभामध्ये मुंबई विद्यापीठात शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी आणि तरूण संशोधकांच्या संशोधन बुध्दीला चालना मिळावी यासाठी मुंबई विद्यापीठ आता या संशोधकांच्या पेटंट नोंदणीसाठी अर्थसहाय्य करण्याची आणि विद्यापीठाचे दुसरे मॉडेल कॉलेज तरेळे, सिंधुदुर्गात उभारले जाण्याची घोषणा मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू, डॉ. राजन वेळूकर यांनी केली.

➢ दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठाच्या १५८ वा वर्धापन दिनानिमित्त मुंबई विद्यापीठाच्या आस्थापनेवरील कायमस्वरूपी शिक्षकेत्तर कर्मचा-यांना विम्याच्या सरंक्षणाची भेट देण्यात आली आहे. या सरंक्षण विम्यात कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांचा समावेश असणार आहे. मुंबई विद्यापीठातील १३७२ कायमस्वरूपी कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबियांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

➢ दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभाग व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने 'माय मराठी' या संभाषणात्मक मराठी-१ चे प्रकाशन अभिनेता आमीर खानच्या हस्ते संपन्न झाले.

➢ दिनांक १५ ऑगस्ट, २०१४ रोजी स्वांतत्र्यदिनानिमित्त मुंबई विद्यापीठातील विद्यानगरी परिसरात ध्वजारोहण समारंभ संपन्न झाला.

➢ दिनांक १४ सप्टेंबर २०१४ रोजी लोकशाही सबलीकरण कार्यशाळा थिंक महाराष्ट्र डॉट कॉम आणि मुंबई विद्यापीठाचा तत्त्वज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत प्रमुख वक्ते बी.बी.ठोंबरे, मिलिंद थत्ते, प्रा. राधाकृष्ण पिल्लई, प्रकाश बाळ आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम लाईफ सायन्स बिल्डिंग सभागृह कलिना येथे पार पडला.

➢ **मुंबई विद्यापीठातर्फे देशातील पहिला सार्वजनिक धोरण (मास्टर इन पब्लिक पॉलिसी) या पदव्युत्तर अभासक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. राज्याचे मुख्य सचिव स्वाधिन क्षत्रिय यांच्या हस्ते या अभ्यासक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. संजय चहांदे, मा. कुलगुरू, डॉ. राजन वेळूकर, मा. प्र–कुलगुरू, डॉ. नरेश चंद्र आदी उपस्थित होते.**

➢ **नुकत्याच काश्मिर येथे झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे मुंबई विद्यापीठाने पंतप्रधान राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीला २५ लाख रूपयांचे योगदान दिले आहे. विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ. राजन वेळूकर यांनी मा. राज्यपाल तथा कुलपती विद्यासागर राव यांच्याकडे धनादेश सुपूर्द केला.**

➢ **मुंबई विद्यापीठाच्या पत्रकारिता विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी संयुक्तपणे दोन दिवसीय राऊंड टेबल कॉन्फरन्सचे आयोजन केले.**

➢ **जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यवस्थापन शैक्षणिक संकुल उभारण्यात येणार आहे. या संकुलाच्या स्थाननिश्चितीच्या कार्यक्रमावेळी मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू, डॉ. राजन वेळूकर, जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज संस्थेच्या संचालिका, डॉ. कविता लघाटे आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते.**

➢ **महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त मुंबई विद्यापीठात 'मुनीजन' कार्यक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस व स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छतेचा संकल्प करण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील एनसीसी आणि एनएसएसच्या पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी गुरूवारी शपथ घेतली. विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ. राजन वेळूकर यांनी ही शपथ दिली.**

यानंतर अध्यक्षांनी कार्यक्रम पत्रिकेवरील बाब क्र.१ अधिसभेपुढे मंजूरीसाठी मांडली.

**बाब क्र. १ : दिनांक २० व २१ मार्च रोजी झालेल्या वार्षिक अधिसभेचे इतिवृत्त संमत करणे.**

कार्यक्रम पत्रिकेवरील हा विषय सभेपुढे आला असता, सन्माननीय सदस्य श्री. महादेव जगताप, डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम, डॉ. (श्रीमती) सुप्रिया करंडे, श्री. संजय वैराळ, डॉ. (श्रीमती) अनुपमा सावंत, श्रीमती निलिमा भुर्के, प्राचार्य (डॉ.) मुरलीधर कु-हाडे, श्री. सुधाकर तांबोळी, डॉ. माधवी निकम, श्री. दिलीप पवार, श्री. संजय शेटे, श्री. राजन कोळंबेकर, डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद, डॉ. वसंत शेकडे, श्री. प्रदीप सावंत, प्राचार्य गोरक्ष पारगावकर, प्राचार्य नारायण राजाध्यक्ष, प्राचार्य (डॉ.) विष्णू नंदा मगरे, प्राचार्य (डॉ.) सिध्देश्वर गडदे, डॉ. (श्रीमती) संगिता गोडबोले, डॉ. प्रल्हाद जोगदंड, श्री. शशिकांत झोरे, प्राचार्य (डॉ.) मुरलीधर चांदेकर यांनी इतिवृत्ताच्या अनुषंगाने आपली मते पुढीलप्रमाणे मांडली.

इतिवृत्तात त्रुटी आहेत, सन्माननीय सदस्यांनी पोटतीडकिने मांडलेल्या काही मुद्यांचा त्यात अंतर्भाव नाही, प्रशासनाने दिलेल्या अनेक आश्वासनांचा त्यात उल्लेख नाही, जाणूनबुजून काही मुद्दे इतिवृत्तात समाविष्ठ करण्यात आलेले नाहीत, सभागृहातील चर्चेत सहभागी झालेल्या काही सदस्यांची नावे त्यामध्ये नाहीत, इतिवृत्त फारच संक्षिप्त आहे असे आक्षेप काही सदस्यांनी नोंदवले. एखाद्या सदस्याने मांडलेल्या प्रस्तावावरील चर्चेत सहभागी झालेल्या इतर सर्व सदस्यांची नावे इतिवृत्तात असावीत, इतिवृत्त म्हणजे सभासदांनी विद्यापीठाच्या कामकाजात केलेल्या सहकार्याची पावती असते, इतिवृत्त हा महत्वपूर्ण रेकॉर्ड आहे, इतिवृत्ताचा मसुदा ३० दिवसांत सदस्यांना उपलब्ध करून द्यावा व त्यामध्ये काही सुधारणा सुचवावयाच्या असल्यास सभासदांनी १५ दिवसांत विद्यापीठाला कळवावे, परिनियम २६८ नुसार सभेनंतर १२ आठवड्याच्या आत इतिवृत्ताचा मसूदा पाठवावा अशी तरतूद आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करावी, Audio Recording सोबत सभागृहाच्या कामकाजाच्या नोंदी लघुलेखकाद्वारे घ्याव्यात आदी मुद्दे यावेळी मतप्रदर्शनातून पुढे आले. श्री. सुधाकर तांबोळी यांनी त्यांना पाठविण्यात आलेली सी.डी कोरी असल्याचे निदर्शनास आणून दिले व असे गंभीर प्रकार होवू नयेत अशी भावना व्यक्त केली. प्रशासनातर्फे त्यांना लगेच दुसरी सी.डी देण्यात आली.

कार्यवृत्त व इतिवृत्त यामध्ये फरक आहे. सभागृहाच्या संपूर्ण कामकाजाची सी.डी (संगणक तबक) सर्व सदस्यांना दिली जाते त्यामुळे इतिवृत्त संक्षिप्त असावे असा निर्णय यापूर्वी अधिसभेत झालेला आहे. श्री. गणेश चव्हाण, प्राचार्य (डॉ.) विष्णू मगरे,

डॉ. (श्रीमती) अनुराधा मजुमदार, श्रीमती निलिमा भुर्के, श्रीमती कविता लघाटे या सदस्यांचा समावेश असलेल्या समितीने इतिवृत्त प्रामाणिकपणे तयार केले आहे. काही वेळा सभागृहात प्रस्तावावरील चर्चेत मुख्य मुद्दा बाजूला राहतो, अनेक वेगवेगळे मुद्दे मांडले जातात. कोणत्याही सदस्यांचे नाव व मुद्दा जाणीवपूर्वक वगळण्यात आलेला नाही. तरीदेखील इतिवृत्तात जर काही त्रुटी राहिल्या असतील तर इतिवृत्त समितीचा निमंत्रक या नात्याने त्याची जबाबदारी स्विकारतो असा खुलासा प्रा. अंबादास मोहिते यांनी केला.

श्री. संतोष सोनवणे व त्यांच्या सहका-यांनी तसेच समितीच्या सदस्यांनी प्रामाणिकपणे काम केले असून काम करणा-याच्या हातून काही चुका होवू शकतात. पण त्याबद्दल विनाकारण संशय घेतला जावू नये. इतिवृत्त हे संक्षिप्त असले पाहिजे असे मत श्री. गणेश चव्हाण यांनी व्यक्त केले.

मागील सभेचे इतिवृत्त तयार करणा-या समितीमध्ये अधिसभेच्या सर्व घटकांचे प्रतिनिधी होते. त्यांनी आणि प्रशासनाने अतिशय स्वच्छ भावनेने काम केले आहे. त्यांचे अभिनंदन करून मागील अधिसभेच्या इतिवृत्ताबाबत सदस्यांना काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी कुलसचिवांना लेखी स्वरूपात १० दिवसांत सादर कराव्यात. सदस्यांच्या योग्य सूचनांचा इतिवृत्तात समावेश करण्यात येऊन सुधारित इतिवृत्त सदस्यांना पाठविण्यात येईल असे कुलगुरूंनी जाहीर केल्यावर इतिवृत्तास सभागृहाने बहुमताने मंजूरी दिली.

इतिवृत्तामध्ये असलेल्या त्रुटी, मागील सभेतील आश्वासनांवरील कार्यवाही अहवालाबाबत विद्यापीठ प्रशासनाकडून झालेली दिरंगाई, यामुळे सभागृहातील उपस्थित काही शिक्षक व पदवीधर प्रतिनिधींनी इतिवृत्त मंजूरीस आक्षेप नोंदविला.

प्रशासनातर्फे मागील अधिसभेच्या सभेतील दिलेल्या आश्वासनावरील कार्यवाही अहवालाच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात आल्या. सन्माननीय सदस्यांनी या कार्यवाही अहवालावर चर्चेची मागणी केली ती मा. अध्यक्षांनी मान्य केली.

**कार्यवाही अहवालावरील चर्चेदरम्यान सन्माननीय सदस्यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले.**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रासाठी गठित करण्यात आलेल्या समितीने दिलेल्या अहावालावर विद्यापीठाने कार्यवाही करावी.

२. पेढांरकर व तासगांवकर कॉलेजच्या चौकशी समितीबाबतची पत्रे समिती सदस्यांना विलंबाने मिळाली, त्यामुळे कार्यवाहीस विलंब.

३. कार्यवाही अहवाल सदस्यांना घरपोच पाठवावा.

४. कार्यवाही अहवालात सभागृहात उपस्थित करण्यात आलेल्या सर्व महत्वपूर्ण मुद्यांचा समावेश असावा.

५. तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयाची ज्या महाविद्यालयांनी काहीच दखल घेतली नाही त्यांच्यावर काय कार्यवाही केली याचा कार्यवाही अहवालात उल्लेख नाही.

६. ज्या महाविद्यालयांनी मराठी भाषा दिन साजरा केला नाही त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली त्याचा उल्लेख नाही.

७. विद्यापीठाच्या कलीना परिसरात झालेल्या अतिक्रमणाबद्दल काय कार्यवाही करण्यात आली त्याचा उल्लेख नाही.

८. एम.के.सी.एल. मुळे विद्यार्थ्यांच्या झालेल्या नुकसानामुळे एम.के.सी.एल वर कारवाई करावी.

९. तासगांवकर कॉलेज मध्ये ९-९ महिने पगार दिले जात नाहीत.

१०. कल्याण सब सेंटर येथे स्कूल ऑफ इंजिनिअरींग सायन्सेस ह्युमॅनिटीज या इमारतीच्या बांधकामाची माहिती द्यावी व त्याबाबत लवकर कार्यवाही करावी.

११. आयडॉलची ऑनलाईन प्रमाणे ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करावी, स्टडी मटेरीयल लवकर मिळावे.

१२. पेंढारकर कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांकडून घेतलेली वाढीव फी परत करण्यात यावी.

१३. विद्यापीठाच्या हेल्थ सेंटर मध्ये २४ तास आरोग्यसेवा उपलब्ध असावी तसेच डॉक्टरांची पदे भरावीत, अद्ययावत लेबॉरेटरी असावी तसेच रुग्णवाहिकेची सोय असावी.

१४. पेपर फुटीच्या प्रकाराबाबत नेमलेल्या समितीच्या अहवालावर काय कारवाई करण्यात आली त्याचा उल्लेख नाही.

१५. पैसे घेवूनही विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात आले नाही. याकरिता ५०/- रूपये भरलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येची विद्यापीठाकडे माहिती नाही.

१६. कल्याण उपकेंद्रात वसतीगृह, ग्रंथालय व गेस्ट हॉऊसची व्यवस्था करण्यात यावी, स्पोर्ट सेंटर सुरु करण्यात यावे व स्टाफ क्वार्टर देखील बांधण्यात यावेत.

१७. कर्मचा-यांच्या पगारामधून पैसे कापून घेतल्यामुळे पेण कॉलेजवर काय कारवाई करण्यात आली.

१८. पेंढारकर कॉलेजने फी वाढ केल्याबद्दल त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

या चर्चेत सन्माननीय सदस्य डॉ. प्रल्हाद जोगदंड, श्री. प्रदीप सावंत, श्रीमती निलिमा भूर्के, श्री. सुधाकर तांबोळी, डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम, श्री. वसंत शेकडे, श्री. संजय वैराळ, श्री. दिलीप पवार, प्राचार्य (डॉ.) कु-हाडे, श्री. विवेक देशमुख, श्री. राजन कोळंबेकर, डॉ. (श्रीमती) सुप्रिया करंडे, श्री. गणेश चव्हाण, डॉ. (श्रीमती) माधवी निकम, डॉ. विजय पवार, श्री. महादेव जगताप, डॉ. (श्रीमती) संगीता गोडबोले यांनी सहभाग घेतला.

श्री. सुधाकर तांबोळी व श्री. प्रदीप सावंत यांनी विद्यापीठाला रुग्णवाहिका देण्याची तयारी दर्शविली असता राजकीय पक्षाऐवजी व्यक्ती वा सामाजिक संस्थाकडून रुग्णवाहिका देण्यात येणार असल्यास स्विकारता येवू शकेल असे मत मा. कुलगुरुंनी व्यक्त केले.

कार्यवाही अहवालावरील चर्चेच्या अनुषंगाने मा. कुलगुरु बोलत असतांना व्यत्यय आल्यामुळे कुलगुरु सभागृहातुन बाहेर गेले. त्यानंतर सभा १० मिनिटांकरिता तहकूब करण्यात आली.

कुलगुरुंच्या उपस्थितीत सभेला पुन्हा सुरुवात झाल्यानंतर विद्यापीठ प्रशासन दिलेल्या आश्वासनांची पुर्तता करीत नाही याचा निषेध म्हणून प्राचार्य (डॉ.) मुरलीधर एस. कु-हाडे, (श्रीमती) संगिता अतुल गोडबोले, डॉ. संजय कुमार, डॉ. (श्रीमती) अनुराधा संदिप मझुमदार, डॉ. विवेक बळवंतराव देशमुख, डॉ. अभय नामदेवराव बांबोले, डॉ.(श्रीमती) सुनिता दशरथ खारीवाल, डॉ. प्रल्हाद गंगाराम पवार, डॉ. दिपक गंगाधरराव बीडवई, डॉ. (श्रीमती) माधवी सुधीर निकम, डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद, डॉ. (श्रीमती) अनुपमा जयवंत सावंत, डॉ. वसंत सिताराम शेकडे, डॉ. (श्रीमती) मोहसिना मुकादम, डॉ. शितलाप्रसाद दुबे, डॉ. (श्रीमती) शशिरेखा सुरेश कुमार, डॉ. (श्रीमती) सुप्रिया दि. करंडे, श्री. महादेव बाबुराव जगताप, श्री. प्रदीप बाळकृष्ण सावंत, श्री. सुधाकर शंकर तांबोळी, श्री. गणेश सदाशिव चव्हाण, श्रीमती निलीमा नंदकुमार भुर्के, श्री. संजय तुळशीराम वैराळ, श्री. शशिकांत काशिनाथ झोरे, श्री. राजन वसंत कोळंबेकर, श्री. दिलीप दगडू पवार या सन्माननीय सदस्यांनी सभात्याग केला.

**बाब क. २ : महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ चे कलम ८२ नुसार महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता अद्ययावत केलेला बृहत आराखडा.**

महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांनी बृहत आराखडा सभेपुढे मांडला त्यास प्राचार्य डॉ. सिध्देशवर गडदे यांनी अनुमोदन दिले.

बृहत आराखड्यावरील चर्चेत सहभागी होताना डॉ. विजय पवार यांनी बृहत आराखडयात महिला महाविद्यालयाचा समावेश असावा व वाडा, मोखाडा या आदिवासी भागात नवीन महाविद्यालयास परवानगी द्यावी असे मत व्यक्त केले. डॉ. बाळकृष्ण भोसले आपले मत व्यक्त करताना म्हणाले की, आपल्याला महाविद्यालयांची संख्या वाढवायची नाही तर गुणात्मक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीकोणातून विचार करायचा आहे त्यामुळे जी महाविद्यालये चांगले काम करतात त्यांना प्रोत्साहन व अनुदान द्यावयास हवे नवीन महाविद्यालयांना मान्यता न देता फक्त नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांनाच परवानगी द्यावी. गेल्या ५ वर्षात विद्यापीठाला वेगवेगळया प्रकारची अनुदाने मिळालीत त्याची नोंद घेतली जावी तसेच इच्छुक महाविद्यालयांना व विभागांना स्वायतत्ता प्रदान करण्यात यावी. प्रत्येक विभागाने पुढील पाच वर्षाचे काय व्हिजन आहे त्यावर चर्चा करण्याकरीता अधिसभेची विशेष सभा बोलवावी अशी सूचना सुध्दा डॉ. भोसले यांनी केली. ठाणे व पालघर जिल्हयासाठी विधी महाविद्यालय असावे, प्रशासनाचे विकेंद्रीकरण करावे, एका तुकडीत ८० विद्यार्थी असावेत अशी सूचना प्राचार्य श्री. नारायण राजाध्यक्ष यांनी केली.

पालघर हा नवीन जिल्हा झाल्यामुळे या जिल्हयात नवीन महाविद्यालय स्थापन करण्याची प्रशासनाने परवानगी द्यावी तसेच Extension Work हा विषय ऐच्छिक असावा असे मत प्राचार्या श्रीमती राऊत यांनी व्यक्त केले.

प्राचार्य रवींद्र कर्थाडी यांनी अपंगांकरिता महाविद्यालय निर्माण करण्यात यावे अशी भावना व्यक्त केली. वाढती लोकसंख्या आणि त्यांच्या महत्वाकांक्षा तसेच देशाला जगातील विकसित देशांमध्ये योग्य स्थान मिळविण्याच्या दृष्टीने मुबंई विद्यापीठाच्या संख्यात्मक विस्तारीकरणासाठी व गुणात्मक सक्षमीकरणासाठी योग्य दिशा देणे हा बृहत आराखडयाचा उद्देश आहे असा बदल करावा अशी सूचना प्राचार्य (डॉ.) मुरलीधर चांदेकर यांनी केली.

इनोव्हेटीव्ह कोर्सेसना मान्यता देण्यात यावी. बी.ए, बी कॉम पेक्षा इनोव्हेटीव्ह कोर्सेस कसे फायदेशीर आहेत याबाबत ग्रामीण भागातील महाविद्यालयांशी सुसंवाद साधल्यास त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होईल असे मत प्राचार्य एस.आर भोसले यांनी मांडले.

इनोव्हेटीव्ह कोर्सेसना प्राधान्य देण्यात यावे याबाबतचा मुद्दा प्राचार्य श्रीमती चैताली चक्रवर्ती यांनी मांडला.

महिला महाविद्यालयाचा सहभाग असावा, ती एक समाजाची मागणी आहे. (अधिसभेच्या बृहत आराखड्यात सूचना व बदल करता येतात की नाही याची माहिती नाही परंतु अधिसभेने केलेल्या सूचनांचा नक्कीच त्यात समावेश करावा.) बृहत आराखडा तयार करतांना भौगोलिक विचार करणे अत्यंत महत्वाचे आहे. बृहत आराखड्याच्या दृष्टीकोनातून विद्यापीठाने एक चांगले पाऊल टाकले असून आमची विद्यापीठाला नेहमीच साथ असणार आहे असे मत प्राचार्य काझी यांनी व्यक्त केले.

बृहत आराखडा मान्य करावयाचे अधिकार महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषदेला आहेत अधिसभेला नाही. बृहत आराखड्यावरील असलेल्या सूचना चांगल्या असून त्याबाबत अधिसभेने शिफारस करावी. विद्यापीठाच्या पुढील पाच वर्षाच्या दृष्टीने एक आराखडा तयार करण्यासाठी अधिसभेच्या सदस्यांची एक कार्यशाळा किंवा विशेष बैठक घेण्यात यावी अशी सूचना प्रा. आंबादास मोहिते यांनी केली; तर महाविद्यालयांच्या निवडीसाठी लावण्यात येणा-या निकषाच्या पध्दतीत बदल करावा अशी सूचना डॉ. डी. वाय. पाटील यांनी केली.

ठाणे जिल्ह्याचे विभाजन झालेले आहे आणि पालघर जिल्ह्यात बहुसंख्य आदिवासी भाग असल्यामुळे सदर आदिवासी भागात प्रस्तावीत महाविद्यालयांना व्यवसायाभिमूख महाविद्यालये स्थापन करावयाची असल्यास त्यांच्या प्रस्तावाचा विचार करावा असे मत प्राचार्य (डॉ.) विष्णू मगरे यांनी मांडले.

पालघर जिल्हा नवीन झाल्यामुळे तेथे विधी महाविद्यालय (law college), तसेच तेथील आदिवासी विकासाच्या दृष्टीने नवीन महाविद्यालयांसाठी शासनाच्या निकषांच्या आधीन राहून प्रस्ताव स्विकारण्यात येतील असा खुलासा प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी केला.

सभागृह वातानुकुलीत केल्याबद्दल अध्यक्षांचे आभार मानले. तसेच एम.के.सी.एल शी असलेला करार रद्द करावा व आपल्याकडे डाटा सेंटर असावे अशी मागणी श्री. संजय शेटे यांनी केली.

विद्यापीठाने चांगली केलेली कामे आमच्यापर्यंत पोहचत नाहीत. त्या घडामोडी संकेतस्थळ (web site) वर टाकाव्यात तसेच विद्यापीठातील हंगामी सुरक्षा रक्षक सन १९९६ पासून कार्यरत आहेत आणि तेव्हा पासून विद्यापीठात भरती झालेली नाही.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची वाढलेली संख्या, विद्यानगरी परिसरात वाढलेल्या इमारती इत्यादींचा विचार करता सुरक्षा रक्षकांची भरती करणे गरजेचे आहे. सुरक्षा रक्षकांमध्ये वाढ होणे गरजेचे आहे याबाबत विद्यापीठाने गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे असे मत प्राचार्य नारायण राजाध्यक्ष यांनी मांडले

बृहत आराखडयातील चर्चेनंतर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक, प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी विद्यापीठाच्या महत्वपूर्ण घडामोडी तसेच नियोजित असलेल्या कार्यक्रम/उपक्रमांची माहिती सभागृहास दिली.

विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात, ग्रीन बिल्डींग संकल्पनेवर आधारित साकारत असलेले मॉडर्न नॉलेज रिसोर्स सेंटर, आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक ग्रंथालय, मुंबई विद्यापीठाच्या आफ्रिका अभ्यास केंद्र व मध्य युरेशीया अभ्यास केन्द्रातर्फे भारतीय वायुसेनेतील अधिका-यांकरिता एम.फील व पी.एच.डी चे शिक्षण, विद्यानगरी परिसरात माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने जमनालाल बजाज इंन्स्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे साकारत असलेले आतंरराष्ट्रीय दर्जाचे व्यवस्थापन शिक्षणाचे संकुल, ५ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी घेतलेली स्वच्छ भारत अभियानाची शपथ, विश्व अहिंसा दिनानिमित्त गेट वे ऑफ इंडियावर आयोजित भव्य भजन संध्या, विद्यानगरी परिसरात उभारले जात असलेले परदेशी विद्यार्थ्यांकरिता अद्ययावत वसतीगृह, सर कावसजी जहांगीर दीक्षांत सभागृहाच्या वातानुकूनलीकरणाकरिता महानगर गॅस लिमिटेडचे १ कोटी रुपयाचे अर्थसहाय्य, देशात प्रथमच विद्यापीठाने सुरु केलेला मास्टर इन पब्लीक पॉलिसी हा अभ्यासक्रम, जम्मू-कश्मीर पूरग्रस्तांकरिता विद्यापीठाकडून २५ लाखाची मदत, यूजीसी कडून विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागास मिळालेले १ कोटी रुपयांचे अनुदान, विद्यापीठाने सुरु केलेली सिंधू स्वाध्याय संस्था, विद्यापीठ विद्यावाहिनी उपक्रम (Mobile Knowledge Resource Centre) रत्नागिरी जिल्हयातील मंडणगड तालुक्यातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुळगावी गावक-यांच्या सहकार्याने उभारण्यात आलेले आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक संकूल, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थाना देण्यात येणा-या स्वायत्ततेच्या संख्येत मुंबई विद्यापीठ राज्यात अग्रेसर, तरुण संशोधकांना चालना देण्यासाठी विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या पेटंटचा खर्च उचलणार आदी महत्वपूर्ण घडामोडींची माहिती सभागृहापुढे सादर केली असता विद्यापीठाने केलेल्या कार्याबद्दल उपस्थित सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन केले.

त्यानंतर प्र-कुलगुरूंनी इंडियन सायन्स कॉग्रेस इतक्या वर्षानंतर भारतात जानेवारी महिन्यामध्ये होत असून मुंबई विद्यापीठाकडे त्याचे यजमानपद असल्याची महत्वपूर्ण माहिती अधिसभेला दिली.

अभिनंदन ठराव:

१) ५४ वर्षानंतर मुंबईत इंडियन सायन्स कॉंग्रेस चे आयोजन होत आहे. देशाच्या मा. पंतप्रधानाच्या शुभहस्ते उद्घाटन होणा-या या सायन्स कॉंग्रेस मध्ये देश विदेशातील हजारो वैज्ञानिकांसह अनेक नामवंत व्यक्ती सहभागी होणार आहेत ही विद्यापीठाकरिता निश्चितच अभिमानाची व गौरवाची बाब आहे. अत्यंत महत्वपुर्ण अशा या सायन्स कॉंग्रेसचे यजमानपद स्विकारल्याबद्दल प्राचार्य (डॉ.) सिध्देश्वर गडदे यांनी मुंबई विद्यापीठाच्या अभिनंदनाचा ठराव मांडला त्यास प्राचार्य श्री. मारोती भगत यांनी अनूमोदन दिले. अधिसभेत ठराव सर्वानूमते मंजूर करण्यात आला.

२) मागील अधिसभेच्या बैठकीत अधिसभा सदस्यांनी केलेल्या मागणीप्रमाणे या अधिसभेच्या बैठकीपूर्वी दीक्षांत सभागृह वातानूकुलीत करण्याच्या मागणीची पुर्तता केल्याबद्दल प्राचार्य (डॉ.) सिध्देश्वर गडदे यांनी विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन करणारा ठराव मांडला त्यास प्राचार्य भगत यांनी अनूमोदन दिले. सर्वानूमते ठराव मंजूर करण्यात आला.

३) जम्मू-कश्मीर मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या महाप्रलयात मोठया प्रमाणावर प्राणहानी व वित्त हानी झाली, संपूर्ण जनजीवन उध्वस्त झाले. मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परीषदेने या संदर्भात संवेदनशीलता दर्शवून विद्यापीठातर्फे रु. २५ लाख मदत करण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे विद्यापीठ प्रशासनाने पंतप्रधान सहाय्यता निधीकरिता मा. राज्यपालांकडे रु. २५ लाखाचा धनादेश सुपूर्द केला. मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील इतरही विद्यापीठे जम्मू-कश्मीर पूरग्रस्तांच्या मदतीकरिता पुढे आलीत. विद्यापीठाची उद्दीष्टे लक्षात घेवून व सामाजिक बांधिलकीच्या भावनेने हा विधायक निर्णय घेतल्याबद्दल ही अधिसभा, व्यवस्थापन परीषदेचे अभिनंदन करते व आभार मानते असा ठराव प्रा. अंबादास मोहिते यांनी मांडला व त्यास प्राचार्य श्री. नारायण राजाध्यक्ष यांनी अनूमोदन दिले. अधिसभेने हा ठराव एकमताने पारित केला.

विद्यार्थी हित व विद्यापीठाच्या विकासाच्या दृष्टीने अनेक कामे झाली आहेत, त्याचे श्रेय कुलगुरू वा कोणा एकट्या व्यक्तीचे नाही तर विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमुख व शिक्षकवृंद, प्रशासनातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग, विद्यापीठाच्या हितचिंतकांनी दिलेले योगदान व सहकार्यामुळेच विद्यापीठाला ही सर्व कामे करणे शक्य झाल्यामुळे मा. कुलगुरूंनी सर्वांचे आभार मानले.

प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे यांनी महत्वाच्या घडामोडी तसेच विद्यापीठाच्या विकासाबाबत थोडक्यात वाचन केले. ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत पुस्तकांची सुविधा उपलब्ध करून देणे आणि कल्याण केंद्राबाबत तसेच विद्यापीठाने केलेले चांगले कामकाज आदी मुद्यांबाबत सभागृहास माहिती द्यायची होती परंतु माहिती देत असतांना अनावधानाने घडलेल्या घटनेबाबत सभागृहाची अगोदरच दिलगिरी व्यक्त केल्याबाबतचा मा. कुलगुरूंनी उल्लेख केला. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने मोबाईल लायब्ररी सुरू केली आहे. कल्याण केंद्राचा संपूर्ण आराखडा तयार असून संपूर्ण कामकाज एका वर्षात पूर्ण होईल तसेच Academic Planning बाबत संपूर्ण आराखडा आय.आय.टी च्या प्राध्यापकांकडून तयार करण्यात आलेला असून बजाज संस्थेच्या Academic Planning मध्ये हार्वर्ड च्या प्राध्यापकांनी सहभाग घेतलेला आहे. विद्यापीठात ब-याच चांगल्या गोष्टी होत असून, विद्यापीठ नवीन घडामोडी करत आहे. विद्यापीठ त्याअनुषंगाने वृत्तपत्रात बातम्या देखील देते परंतु त्या संपूर्ण येत नाहीत म्हणून प्राचार्य राज्याध्यक्ष सरांनी सांगितल्याप्रमाणे महत्वाच्या घडामोडी, विकासाची कामे संकेतस्थळावर टाकली जातील अशी माहिती मा. कुलगुरूंनी सभागृहास दिली.

तसेच मा. कुलगुरूंनी विद्यापिठाच्या वतीने सर्व सन्माननीय सदस्यांना, विद्यापीठ अधिकारी/कर्मचा-यांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

सभेचे कामकाज संपले असे अध्यक्षांनी जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

मुंबई – ४०० ०३२,
२७ जानेवारी, २०१५

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)